सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अतांत्रिक गटातील अभ्यासक्रमाच्या नवीन/अधिकच्या तुकड्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कौशल्य , रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी-२०२२/प्र.क्र.३१/कौशल्य-२,

मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०७ एप्रिल, २०२२

<u>वाचा</u>: १) शिक्षण व सेवा योजन विभाग, शासन निर्णय क्र.इएक्सएम ७३८६/५३२१६/९०१/ तांशि-४,दि. ०६ मार्च, १९८६

२) शिक्षण व सेवा योजन विभाग, शासन निर्णय क्र.इएक्सएम ७३८६/५३२१६/९०१/ तांशि-४,दि. १५ ऑक्टोबर, १९८६

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:व्हीओसी-२०१२/५९१/ प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि. १६ जानेवारी, २०१३

४) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२१/ प्र.क्र.१०/कौशल्य-२, दि.११ फेब्रुवारी, २०२१

५) महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.२० जानेवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध झालेला महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१

६) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग अधिसूचना क्र.व्हिओसी-२०२०/ प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.२५ जानेवारी, २०२२

७) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र क्र.मराकौविमं/का-१/मान्यता विभाग/२०२१-२२/२५२ दि.१६ फेब्रुवारी, २०२२

<u>प्रस्तावना:</u>

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत (पूर्वीचे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ) औद्योगिककरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल इत्यादींमुळे मंडळाच्या अभ्यासक्रमांत कालानुरुप सुधारणा तसेच वाढ करुन सद्यस्थितीत मंडळामार्फत विविध गटातील ६ महिने,१ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अंशकालीन व पूर्णवेळ स्वरुपाचे असे अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत.सदर अभ्यासक्रम चालविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून इच्छुक खाजगी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी इच्छुक असलेल्या खाजगी संस्थांकडून प्राप्त अर्जाची संबंधित जिल्हयाच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेमार्फत तपासणी व निरीक्षण करून मंडळाकडे पात्र संस्थेची शिफारस केली आहे. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत करून पात्र संस्थांची यादी शासन मान्यतेसाठी संदर्भाधीन क्र. ७ येथील पत्रान्वये सादर करण्यात आली आहेत. त्यानुसार सन २०२१-२२ पासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अतांत्रिक गटातील अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन संस्था/अधिकच्या तुकडयांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यास इच्छुक असलेल्या खाजगी शैक्षणिक संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांची छाननी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत करून, त्यानुसार आवश्यक मानकांची पूर्तता करणाऱ्या संस्थेस महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अतांत्रिक गटातील अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतची शिफारस मंडळामार्फत करण्यात आली. त्या संस्थांचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र "अ"** मध्ये सोबत जोडण्यात आला असून, सदर संस्थांना सन २०२१-२२ पासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अतांत्रिक गटातील अभ्यासक्रम नवीन संस्थेत नवीन/ अधिकच्या तुकडयांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:

१. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम राबविणास मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ तसेच, संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबधित कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे पालन करणे बंधंनकारक राहील.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत मान्यता देण्यात आलेली आहे त्याच जागेत विद्यार्थी प्रवेश करण्यात यावेत. तसेच त्याच जागेचा मान्यतेबाबत विचार करण्यात येईल, जर जागेत बदल आढळल्यास मान्यता रद्द करण्यात येईल.

३. सदर संस्थेस अभ्यासक्रम चालविण्यासाठीची मान्यता ही संस्थेने जागेसंबंधी सादर केलेल्या दस्ताऐवजामधील एकूण क्षेत्रफळांचे आणि नकाशा मधील उपलब्ध जागेच्या आधारे देण्यात येत आहे.

४. सदर संस्थेस महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरु करण्यास स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यात येणार नाही. तसेच, या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, तसेच शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क चा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

५. सदर अभ्यासक्रमांना स्वंयअर्थसहाय्यहित तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा/वेतन व तद्अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही .

६. सदर संस्थेस अर्ज केलेल्या प्राप्त नस्तीमधील / प्रस्तावामध्ये अभिलेख्यानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, त्यामध्ये भविष्यात काही विसंगती/ बेकायदेशीर आढळल्यास संबंधित संस्थेतेतील अभ्यासक्रमाची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल आणि अशा दोषी संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

७. "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता मिळालेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम" अशा सूचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकड्यांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता यांचा उल्लेख करण्यात यावा. संस्थेचे नाव मेडीकल/ इंजिनिअरींग/ पॉलीटेक्नीक/ आय.टी.आय. अथवा तत्सम नाव देण्यात येऊ नये आणि त्याऐवजी संस्थेच्या नावाच्या पुढे कौशल्य विकास संस्था असे नमूद करणे बंधनकारक आहे. संस्थानी अशा प्रकारे नावात बदल करून सादर न केल्यास अशा संस्थांचा मान्यतेसाठी विचार करण्यात येणार नाही. संस्थेने पायाभूत सुविधा व इतर बाबीची पुर्तता प्रस्ताव/ अर्ज सादर करतेवेळी त्यामध्ये संस्थेचे जुने नाव व सुधारीत नाव असे दोन्ही नावे नमूद करणे बंधनकारक राहील.

८. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक: व्हीओसी-२०१२/५९१/ प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि. १६ जानेवारी, २०१३ अन्वये आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाद्वारे अथवा बॅक गॅरटीच्या स्वरुपात संबधीत संस्थेने भरणे आवश्यक राहील.

९. मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नवीन तुकडयांची प्रवेशक्षमता प्रती तुकडी २५ इतकी राहील.

१०. संस्थेने विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेश केल्यास, किंवा मंजुरी पेक्षा ज्यादा प्रवेश केल्यास असे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही. याकरीता संस्थेस "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" लागू राहील.

११. मान्यताप्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरू न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात शासनाने राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बदल केल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम राबविणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१३. मान्यता दिलेल्या संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले आहेत तसेच अभ्यासक्रमनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांनी शासनास दोन महिन्यात सादर करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२२०४०७१७५५३५६१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT AND ENTREPRENEURSHIP DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=be7f8a656a063523ecdbac5e75130d8b7a4674a77a2691e4bf21582d392883e9,
pseudonym=323361D01E3FB518718EE3AAAE55DB3EC668FBE8,
serialNumber=415BAA8242ED5D99644FE1533246B0A85DC3D52848FB6CE23F47DAF8D647AE5A, cn=PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
Date: 2022.04.07 17:58:36 +05'30'

(प्रदीप सा. शिवतरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कौ.रो.उ.व ना.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कौ.रो.उ.व ना.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई-४००००१.
५. संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई -४०००५१.
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई -५१ यांच्या मार्फत)
७. संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई -४०००५१ यांच्या मार्फत).
८. संबंधित संस्था. (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई -४०००५१ यांच्या मार्फत)
९. निवडनस्ती (कौशल्य-२).

कौशल्य , रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी-२०२२/प्र.क्र.३१/कौशल्य-२, दि.०७ एप्रिल, २०२२ सोबतचे प्रपत्र-अ

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम प्रथमच नवीन संस्थेत नव्याने सुरु करण्यासाठी/जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे/जुन्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ करणे .					
(अभ्यासक्रम गट - अतांत्रिक गट)					
१	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन अन्न व पेय सेवा, (अर्धवेळ), कालावधी सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०११०१**
I	मुंबई	मुंबई उपनगर	गुलशिप इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड स्कील डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट , मेन फ्रेम, रॉयल पाम्स, गोरेगाव पूर्व, आरे मिल्क कॉलनी, मुंबई ४०००६५	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	सातारा	कोयना शिक्षण संस्था,पाटणचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट,पाटण, जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन कुकरी, बेकरी ॲण्ड कन्फेक्शनरी ,(अर्धवेळ),कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०१२०७**
I	मुंबई	मुंबई उपनगर	गुलशिप इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड स्कील डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट , मेन फ्रेम, रॉयल पाम्स, गोरेगाव पूर्व, आरे मिल्क कॉलनी, मुंबई ४०००६५	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	सातारा	कोयना शिक्षण संस्था,पाटणचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट,पाटण, जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
III	पुणे	पुणे	कल्पना एज्युकेशन सोसायटी कौशल्य विकास केंद्र, (F३४०६५)Aआयडियल पार्क गोकुळनगर कात्रज पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
३	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी , (पूर्णवेळ), कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०१२०८**
I	पुणे	सातारा	कोयना शिक्षण संस्था,पाटणचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट,पाटण, जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	मुंबई	पालघर	एस.बी.एस.इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल अँड टुरिसम मॅनेजमेंट,देशमुख फार्म,दिव्याल लाइटस,९० फिट रोड,विरार	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
III	मुंबई	मुंबई उपनगर	गुलशिप इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड स्कील डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट , मेन फ्रेम, रॉयल पाम्स, गोरेगाव पूर्व, आरे मिल्क कॉलनी, मुंबई ४०००६५	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	०१

४	**अभ्यासक्रमाचे नाव - डिप्लोमा कोर्स इन कॅटरींग ऍ़ण्ड रेस्टोरॅण्ट मॅनेजमेंट,पूर्णवेळ),कालावधी दोन वर्ष.**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०१४०७**
I	पुणे	सातारा	कोयना शिक्षण संस्था,पाटणचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट,पाटण, जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	पुणे	कल्पना एज्युकेशन सोसायटी कौशल्य विकास केंद्र,(F३४०६५)Aआयडियल पार्क गोकुळनगर कात्रज पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
५	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन ऑपरेटर कोर्स इन ब्युटी कल्चर, (अर्धवेळ), सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०५१०६**
I	पुणे	कोल्हापूर	सखी महिला प्रशिक्षण कौशल्व विकास संस्था, राजलक्ष्मीनगर, निकम पार्क, देवकर पाणंद, कोल्हापूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	नाशिक	नाशिक	श्रीराम कौशल्य विकास संस्था,लासलगाव	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
III	पुणे	सोलापुर	ब्युटी आयकॉन सलोन अॅन्ड स्कील डेव्हलपमेंट इन्स्टिट्युट, कुर्डूवाडी, तामाढा जि-सोलापुर.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
६	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन ब्युटी केअर (अर्धवेळ),कालावधी -सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०५११८**
I	नागपूर	नागपूर	बिजू स्किल डेव्हलपमेंट इस्टीटयुट, नागपूर ४३/बी यशंवत स्टेडीअम जवळ, HDFC बॅक समोर , धंतोली, नागपूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
७	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन बँकिंग असिस्टंट ,(अर्धवेळ),कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०८२१२**
I	पुणे	कोल्हापूर	युनिक कौशल्य विकास संस्था, बांबवडे, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
८	**अभ्यासक्रमाचे नाव - डिप्लोमा कोर्स इन फॅशन डिझाईनींग ऍ़ण्ड क्लोदींग कन्स्ट्रक्शन ,(पुर्णवेळ) दोन वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०४०१**
I	नाशिक	नाशिक	ड्रीम्स मल्टिमिडीया स्किल एज्युकेशन इन्स्टिट्यूट,युनायटेड आर्केड ,बेसमेंट,नासिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
९	**अभ्यासक्रमाचे नाव - नॉन डेसट्रक्टिव्ह टेस्टींग (अर्धवेळ),कालावधी -सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१११८९**
I	मुंबई	मुंबई उपनगर	इन्स्टिटयुट ऑफ कन्टशन ईक्वीमेंट ॲण्ड लिफ्टींग मशीन ॲण्ड स्कील डेव्लपमेंट इन्स्टिटयुट६०७, आर स्क्वेअर, वीणा नगर, एलबीएस रोड, मुलुंड पश्चिम-४०००८३	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१
१०	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन प्री स्कूल टीचर ट्रेनिंग कोर्स,(पूर्ण वेळ),कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४११२०६**
I	पुणे	कोल्हापूर	द्रष्टी कौशल्य विकास संस्था, दत्तनगर, स्टेट बँकेच्यामागे, पाचगांव, कोल्हापूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१

II	औरंगाबाद	नांदेड	जिवनज्योत सामाजिकसंस्था आल्टी तांडा हदगांव संचलित ईश्वर कौशल्य विकास संस्था, किनवट रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
III	पुणे	पुणे	आदर्श पॅरामेडिकल कौशल्य विकास संस्था,वडकी ता.हवेली जि.पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
IV	मुंबई	मुंबई उपनगर	गुलशिप इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड स्कील डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट , मेन फ्रेम, रॉयल पाम्स, गोरेगाव पूर्व, आरे मिल्क कॉलनी, मुंबई ४०००६५	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	०१
११	**अभ्यासक्रमाचे नाव - टॅनलिंग सेफ्टी (पूर्णवेळ),कालावधी -एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४११२१९**
I	मुंबई	मुंबई उपनगर	इन्स्टिटयुट ऑफ कन्टशन ईक्वीमेंट ॲण्ड लिफ्टींग मशीन ॲण्ड स्कील डेव्लपमेंट इन्स्टिटयुट६०७, आर स्क्वेअर, वीणा नगर, एलबीएस रोड, मुलुंड पश्चिम-४०००८२	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१
१२	**अभ्यासक्रमाचे नाव - इव्हेंट मॅनेजमेंट, (अर्धवेळ) , कालावधी ,एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१५२०५**
I	पुणे	पुणे	एन आय इ एम द इन्स्टीटयूट ऑफ इवेंट मॅनेजमेंट व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर २०२ मोसिक बिल्डिंग फग्युसन कॉलेज समोर शिवाजीनगर पुणे ४	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०३
II	मुंबई	मुंबई उपनगर	एन आय इ एम द इन्स्टीटयूट ऑफ इवेंट मॅनेजमेंट स्कील डेव्हलपमेंट इन्स्टीटयूट, ऑल इंडीया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गॅव्हरमेंट, सी. डी. बर्फीवाला लेन जुहू गल्ली अंधेरी.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०६
१३	**अभ्यासक्रमाचे नाव - ॲडव्हान्स इव्हेंट मॅनेजमेंट (अर्धवेळ) , कालावधी ,एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१५२०६**
I	पुणे	पुणे	एन आय इ एम द इन्स्टीटयूट ऑफ इवेंट मॅनेजमेंट व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर २०२ मोसिक बिल्डिंग फग्युसन कॉलेज समोर शिवाजीनगर पुणे ४	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०३
II	मुंबई	मुंबई उपनगर	एन आय इ एम द इन्स्टीटयूट ऑफ इवेंट मॅनेजमेंट स्कील डेव्हलपमेंट इन्स्टीटयूट, ऑल इंडीया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गॅव्हरमेंट, सी. डी. बर्फीवाला लेन जुहू गल्ली अंधेरी.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०४
१४	**अभ्यासक्रमाचे नाव - डिप्लोमा कोर्स इन हॉटेल ऑपरेशन्स,(पुर्णवेळ)दोन वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०१४०२**
I	मुंबई	पालघर	एस.बी.एस.इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल अँड टुरिसम मॅनेजमेंट,देशमुख फार्म,दिव्याल लाइटस,९० फिट रोड,विरार	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
१५	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन बॉडी बिंल्डीगं,डायटीशीयन ॲण्ड फिटनेस ट्रेनर (अर्धवेळ) सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०४१०२**

I	नाशिक	नाशिक	गौतमी गौरवी फाऊंडेशन संचलित सह्याद्री इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, दुसरा मजला, कांदा बटाटा भवन, द्वारका, जि.नाशिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
१६	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन बेसिक कोर्स इन ब्युटी कल्चर,(अर्धवेळ),कालावधी सहा महिने.**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०५१०८**
I	पुणे	पुणे	एम.डी.लोणारी सोशल ग्रुप संचलित जयहिंद कौशल्य विकास संस्था भोसे चाकण शिक्रापूर ता.खेड,जि.पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
१७	**अभ्यासक्रमाचे नाव-सी.सी.इन प्रोफेशनल कोर्स इन ब्युटीकल्चर ॲण्ड हेअरड्रेसिंग ,(अर्धवेळ),कालावधी सहामहिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०५११२**
I	पुणे	सातारा	ज्ञानदीप कौशल्य विकास संस्था,कराड,जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	सोलापुर	श्री पॅरामेडीकल इन्स्टिट्यूट, ९पी, पुर्व सरस्वती नगर, एस.के.बिराजदार शाळेजवळ, शेळगी, सोलापुर.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
१८	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन टॅक्स ॲन्ड फायनान्स मॅनेजमेंट असिस्टंट, (अर्धवेळ), कालावधीसहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०८१०१**
I	पुणे	पुणे	निलया लाईफ ॲन्ड स्किल्स डेव्लपमेंट सेंटर, ७९५ लक्ष्मी कृपा बॅरिस्ट गाडगीळ रोड, शनिपार जवळ,सदाशिव पेठ,पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०६
१९	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन टाईपराईटिंग (इंग्लिश) (अर्धवेळ), कालावधीसहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०८१०२**
I	औरंगाबाद	लातुर	मैत्री फौडेशन लातूर अंतर्गत निळकंठेश्वर कौशल्य विकास संस्था भातांगळी ता.जि.लातूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२०	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन अकाऊंट असिस्टंट, (अर्धवेळ)कालावधी सहा महिने.**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०८१०३**
I	पुणे	पुणे	निलया लाईफ ॲन्ड स्किल्स डेव्लपमेंट सेंटर, ७९५ लक्ष्मी कृपा बॅरिस्ट गाडगीळ रोड, शनिपार जवळ,सदाशिव पेठ,पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	१०
२१	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप असिस्टंट (अर्धवेळ)कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४०८२०९**
I	पुणे	पुणे	निलया लाईफ ॲन्ड स्किल्स डेव्लपमेंट सेंटर, ७९५ लक्ष्मी कृपा बॅरिस्ट गाडगीळ रोड, शनिपार जवळ,सदाशिव पेठ,पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०२
२२	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी इन कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझाईनिंग (अर्धवेळ),कालावधी सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०१०४**
I	पुणे	सोलापुर	कामिनी गांधी महिला विकास व बहूद्देशिय संस्था, ३६८ दक्षिण कसबा, सोलापुर.	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१
२३	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी इन ड्रेस मेकींग, (अर्धवेळ) सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०१०७**
I	नाशिक	नाशिक	ड्रीम्स मल्टिमिडीया स्किल एज्युकेशन इन्स्टिट्यूट,युनायटेड आर्केड ,बेसमेंट,नासिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२४	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी.इन स्पेशलायझेशन इन ब्लाउझ, (अर्धवेळ), सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०१०८**

I	नाशिक	नाशिक	ड्रीम्स मल्टिमिडीया स्किल एज्युकेशन इन्स्टिट्यूट,युनायटेड आर्केड ,बेसमेंट,नासिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२५	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी. इन भरतकाम व सुशोभितकाम (प्रात्यक्षिक), (अर्धवेळ), सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०११७**
I	नाशिक	नाशिक	न्यु व्हेन्चर स्किल डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ,२ रा मजला,मुक्तांगण अपार्टमेंट,मॉडेल कॉलोनी जि.नाशिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	सातारा	ज्ञानदीप कौशल्य विकास संस्था,कराड,जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२६	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी. इन बेसिक फॅशन डिझाईनिंग (अर्धवेळ), कालावधी सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०११९**
I	औरंगाबाद	लातुर	मैत्री फौडेशन लातूर अंतर्गत निळकंठेश्वर कौशल्य विकास संस्था भातांगळी ता.जि.लातूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	सातारा	ज्ञानदीप कौशल्य विकास संस्था,कराड,जिल्हासातारा	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२७	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी. इन शिवण व कर्तन, (अर्धवेळ), सहा महिने**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०१२१**
I	नाशिक	नाशिक	श्रीराम कौशल्य विकास संस्था,लासलगाव	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२८	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी. इन एलिमेंटस ऑफ गारमेंट मेकिंग ॲण्ड फॅशन डिझाईनिंग ,(अर्धवेळ),कालावधी सहा महिने.**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०१३६**
I	पुणे	कोल्हापूर	सखी महिला प्रशिक्षण कौशल्य विकास संस्था, राजलक्ष्मीनगर, निकम पार्क, देवकर पाणंद, कोल्हापूर	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
२९	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी. इन गारमेंट मॅन्युफॅक्चरींग ॲण्ड फॅशन डिझाईनिंग (अर्धवेळ), एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१०२०४**
I	नाशिक	नाशिक	ड्रीम्स मल्टिमिडीया स्किल एज्युकेशन इन्स्टिट्यूट,युनायटेड आर्केड ,बेसमेंट,नासिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
II	पुणे	पुणे	शि.प्र.मंडळाचे प्रि.एन.जी.नारळकर इन्स्टिटयूट ऑफ करिअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च,कौशल्य विकास संस्था ,१६५५,सदाशिव पेठ टिळकरोड पुणे ३०	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१
III	पुणे	सोलापुर	खादिमने उर्दू फोरम कौशल्य विकास संस्था, प्लॉट क्र.३४/२९, मंत्री चंडक विहार, आसरा चौक, होटगी रोड, सोलापुर.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
३०	**अभ्यासक्रमाचे नाव - सी. सी. इन डिजीटल मार्केटींग ॲण्ड एन्टरप्रेनरशिप ,(अर्धवेळ),कालावधी सहा महिने.**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१११८७**
I	पुणे	पुणे	निलया लाईफ ॲन्ड स्किल्स डेव्लपमेंट सेंटर, ७९५ लक्ष्मी कृपा बॅरिस्ट गाडगीळ रोड, शनिपार जवळ,सदाशिव पेठ,पुणे	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०२
३१	**अभ्यासक्रमाचे नाव - ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी (अर्धवेळ), कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४११२१७**
I	औरंगाबाद	औरंगाबाद	विश्वशांती मित्र मंडळ,औरंगाबाद संचलित महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था,लोअर ग्रांऊड फलोअर रमाई विहार चौसर नगर,ज्योतीनगर रोड,औरंगाबाद	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१

ll	नाशिक	नाशिक	आरंभ कॉलेज ऑफ फायरअँड सेफ्टी कौशल्य विकास संस्था,३ रा मजला,शालीमार टॉवर,नाशिक	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
३२	**अभ्यासक्रमाचे नाव - फायर ऍन्ड इंडस्ट्रियल सेफटी इंजिनियरिंग,(अर्धवेळ), कालावधी दोन वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४११४०३**
l	पुणे	पुणे	सहयाद्रि कौशल्य विकास संस्था गट नं २०७ मु.पो.रांजे ता.भोर जि.पुणे	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	०१
३३	**अभ्यासक्रमाचे नाव - डिप्लोमा कोर्स इन ट्रॅव्हल ऍण्ड टुरिझम मॅनेजमेंट,(पूर्णवेळ),कालावधी दोन वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१४४०१**
l	मुंबई	पालघर	एस.बी.एस.इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल अँड टुरिसम मॅनेजमेंट,देशमुख फार्म,दिव्याल लाइटस,९० फिट रोड,विरार	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०१
३४	**अभ्यासक्रमाचे नाव - ॲडव्हरटायझिंग , मिडिया ॲण्ड इव्हेंट मॅनेजमेंट(अर्धवेळ), कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१५२०७**
l	मुंबई	मुंबई उपनगर	एन आय इ एम द इन्स्टीटयूट ऑफ इवेंट मॅनेजमेंट स्कील डेव्हलपमेंट इन्स्टीटयूट, ऑल इंडीया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गॅव्हरमेंट, सी. डी. बर्फीवाला लेन जुहू गल्ली अंधेरी.	प्रथमच नवीन अभ्यासक्रम	०४
३५	**अभ्यासक्रमाचे नाव - सी.सी.इन हॉस्पीटालिटी ऍण्ड एअर ट्रॅव्हल मॅनेजमेंट प्रशिक्षण(अर्धवेळ),कालावधी एक वर्ष**				**अभ्यासक्रम संकेतांक - ४१७२०१**
l	पुणे	सोलापुर	न्यु एज व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, २००, लष्कर, दक्षिण सदर बझार, रोटे कॉम्प्लेक्स शेजारी, सोलापुर ४१३००३	जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम	०१